# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१९-२०/१०
दिनांक — १९ डिसेंबर,२०१९

<u>परिपत्रक</u> :—

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मानव्यशास्त्र (Humanities); विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology); वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व संस्था प्राचार्य/संचालक, (अल्पसंख्याक महाविद्यालये वगळुन) उपकुलसचिव, शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग, उपकुलसचिव, आस्थापना विभाग यांना कळविण्यात येते की, विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी बिंदुनामावली नोंदवही तपासणी संबधी परिपत्रक क्र.मावक /पडताळणी/२०१९ दिनांक ११ नोव्हेंबर,२०१९ निर्गमित केले आहे. (संलग्न)

संबधित महाविद्यालये, संस्था, आस्थापना विभाग तसेच शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग यांनी उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाची नोंद घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी.

परिपत्रका सोबत विभागीय आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन यांचे उपरोक्त संदर्भिय परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.mu.ac.in) उपलब्ध आहे.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

<u>माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी</u> :—

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व संस्था प्राचार्य/संचालक, (अल्पसंख्याक महाविद्यालये वगळुन) उपकुलसचिव, शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग, उपकुलसचिव, आस्थापना विभाग.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

# विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय
## मागासवर्ग कक्ष

कोकण भवन, रुम नं. २२७, दुसरा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्र. ०२२- २७५७२३२५ ईमेल: assicombccl@gmail.com


क्र.मावक/पडताळणी/२०१९ दिनांक :-११/११/२०१९

UNIVERSITY OF MUMBAI IS/ICD/EGD/201 /- 27 NOV 2019 25794

विषय:- मागास वर्गीय कक्षाकडून बिंदुनामावली पडताळणी बाबत.
संदर्भ:- उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडील पत्र क्र.बीसीसी-२०१८/ प्र.क्र.२००A/१६ ब, दि.१९ एप्रिल, २०१८

## परिपत्रक

१. मागासवर्ग कक्षाकडून रोस्टर पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजूर पदसंख्येत वाढ/घट झाल्यास पदभरतीच्या वेळी अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास विहित मुदतीपूर्वी बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करुन घ्यावी.

२. ज्यावेळी मंजूर पदसंख्या, कार्यरत पदसंख्या व रिक्त पदसंख्या यामध्ये कोणताही बदल होत नसेल, अशावेळी दरवर्षी रोस्टर न तपासता दर तीन वर्षांनी रोस्टर तपासणे उचीत ठरेल. तथापि, प्रत्येक वर्षी जर कार्यरत पदसंख्येमध्ये बदल होत असेल, म्हणजेच रिक्त पदसंख्या बदलत असेल, अशा वेळी दरवर्षी रोस्टर तपासून आरक्षण निश्चिती करणे आवश्यक राहील. तसेच पदभरतीच्या वेळी देखील बिंदुनामावली तपासणे आवश्यक राहील.

३. जर कार्यरत पदसंख्येत दरवर्षी बदल होत असून देखील रोस्टर तपासले नाही तर आरक्षण निश्चिती चुकीच्या पद्धतीने होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, आरक्षणाची योग्य रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने ज्यावेळी कार्यरत पदसंख्या बदलत असेल अशा वेळी, म्हणजेच दरवर्षी रोस्टर तपासणे आवश्यक राहील. ज्यावेळी पुढील ३ वर्षे मंजूर, कार्यरत व रिक्त पदसंख्या बदलणार नसेल तर तीन वर्षांनी रोस्टर तपासण्यास हरकत नसावी.

५. मागासवर्ग कक्षाकडून रोस्टर पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजूर पदसंख्येत वाढ/घट झाल्यास अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास तसेच पदभरतीच्या वेळी विहित मुदतीपूर्वी बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक राहील.

उपरोक्त मुद्यांची कोकण विभागात येणाऱ्या सर्व संबंधित क्षेत्रीय कार्यालये यांनी नोंद घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी.

DR(SP.Cell)
06/12/19
Registrar

सही/-
(शिवाजी दौंड)
**विभागीय आयुक्त**
**कोकण विभाग, कोकण भवन**

**प्रति:** १) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३
२) कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स, चर्चगेट, मुंबई
३) कुलसचिव, बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी
४) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई
६) शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
८) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
९) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, इ-विंटा इम्पेस इमारत, निर्लेप हाऊसजवळ, परेल, मुंबई- ४०० ०१२
१०) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई पश्चिम विभाग, इस्माईल युसूफ कॉलेज कॅम्पस, जोगेश्वरी, मुंबई- ४०० ०६०
११) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१
१२) सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
१३) जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
१४) इतर संबंधित राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय शासकीय/ निमशासकीय कार्यालये/ सर्व शैक्षणिक संस्था

स्थळप्रतीवर मा. विभागीय आयुक्त यांची सही आहे.

11.11.19
(विनोद खिरोळकर)
**सहायक आयुक्त(मावक)**
**कोकण विभाग, कोकण भवन**